# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०७ मार्च, २०२५ / फाल्गुन १६, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### राज्यात स्त्रियांमधील कॅन्सर आजाराबाबत जनजागृती करुन प्रतिबंधासाठी मोफत लसीकरण उपलब्ध करून देण्याबाबत

**(१) * ६०३ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी भारतात एक लाख साठ हजार स्त्रियांना स्तनाचा कर्करोग होऊन त्यापैकी ऐंशी हजार स्त्रिया मृत्यूमुखी पडत असून ग्रामीण स्त्रियांच्या तुलनेत शहरी स्त्रियांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक शाळांमध्ये ९ वी ते १० वी पासून पुढे व सर्व महाविद्यालयांतील मुलींना स्वतः तपासणी (मॅमोग्राफी) करण्याबाबतचे मोफत प्रशिक्षण देण्याबाबत तसेच ३५ वयोगटापुढील सर्व महिलांना विशेषतः ग्रामीण भागांतील आरोग्य केंद्रावर सर्व्हायकल कँन्सरची मोफत लस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, स्तनाच्या कर्करोगाबद्दल माहिती देणारे साहित्य, व्हिडिओ तसेच माहिती देणारे कार्यक्रम आयोजित करणे, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती करण्याकरीता शिबिरे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.

पॉपुलेशन बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री नुसार सदर आकडेवारी खरी आहे.

(२) राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३० वर्षांपेक्षा अधिक वयोगट असलेल्या महिलांची स्तन व गर्भाशयमुख कर्करोग तपासणी केली जाते. वय वर्ष ०१ ते १५ वयोगटाकरीता सर्व्हायकल कॅन्सर लसीकरणाबाबत केंद्र शासन स्तरावरुन आराखडा व धोरण निश्चित करण्यात येत आहे.

(३) कर्करोग जनजागृती करीता असंसर्गजन्य रोग नियंत्रण
कार्यक्रमातंर्गत विविध कार्यक्रम राबविले जातात. यात पॉपुलेशन बेस्ड कॅन्सर व मोहिम स्वरुपात जनजागृती उपक्रम घेतले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतील पात्र लाभार्थी महिला लाभापासून वंचित असल्याबाबत

**(२) * ५८१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व गर्भवती माता, स्तनदा माता तसेच नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे यासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्यावतीने संयुक्तपणे प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविण्यात येत असून कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील हजारो महिला सदर योजनेमधून पहिल्या अपत्यासाठी मिळणाऱ्या पाच हजार रुपयांच्या लाभापासून वंचित राहिल्याने या योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ ते माहे, मार्च २०२३ पर्यंत प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेसाठी अर्ज केलेल्या गरीब व आदिवासी महिलांना तात्काळ लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सॉफ्टवेअर १.०० अंतर्गत रायगड जिल्ह्यात सन २०१७ ते माहे मार्च, २०२३ अखेर पर्यंत ६९५०४ उद्दिष्ट असताना, ७१५६४ उद्दिष्टपूर्ती झालेली असून, १०३ टक्के काम झालेले आहे. तसेच २६३९ अर्ज हे करेक्शन क्यु मध्ये गेले होते.

कर्जत तालुक्यामध्ये सन २०१७ ते मार्च, २०२३ अखेर पर्यंत ४८१० उद्दिष्ट असताना ४८३४ अर्जाची ऑनलाईन नोंदणी झालेली होती. त्यापैकी ९७ अर्ज हे करेक्शन क्यु मध्ये गेले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मनोरुग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) * ४६९ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानसिक आजारांसह ताण-तणावाखाली वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असतानाही त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची पदे रिक्त असून अशा मनोरुग्णालयांतील अ, ब व क संवर्गातील ३५ टक्क्यांहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानकापूर (जि.नागपूर) येथील शासकीय मनोरुग्णालय परिसरात १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयातील विविध आवश्यक पदे भरण्याबाबत माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात आलेला प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती व निर्णय घेऊन मनोरुग्णालयातील गरजू रुग्णांना मदत मिळण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांसह समुपदेशकांची उपलब्धता करून देण्याबाबत तसेच मानकापूर (जि.नागपूर) शासकीय रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठीच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर या चार ठिकाणी प्रादेशिक मनोरुग्णालय कार्यान्वित आहेत. प्रादेशिक मनोरुग्णालयातील पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-पदांचा गोषवारा

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | गट अ | १०३ | ७९ | २४ | २३ |
| २) | गट ब | २४ | ६ | १८ | ७५ |
| ३) | गट क | ६५५ | ५६५ | ९० | १४ |
| ४) | गट ड | १४१४ | १०६९ | ३४५ | २४ |
| | एकूण | २१९६ | १७१९ | ४७७ | २२ |

(२) हे खरे नाही.

(३) सद्य:स्थितीत राज्यातील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयांमध्ये मवैआसे गट-अ ची मनोविकृती विशेषतज्ञ संवर्गाची २९ पदे मंजूर असून त्यापैकी १७ पदे भरलेली आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील चारही मनोरुग्णालयांमध्ये वैदयकीय अधिकारी गट-अ मधील मंजूर ५४ पदांपैकी ५३ पदे भरलेली असून यामध्ये १० वैदयकीय अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता ही मनोविकृती विषयातील पदव्युत्तर पदवी व पदविका आहे. त्यांच्यामार्फत मनोरुग्णालयातील मनोरुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येत आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालयातील गट-ब संवर्गातील चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ, वैदयकीय अधिकारी यांची ०६ पदे मंजूर असून त्यापैकी ०३ पदे भरलेली आहेत.

सद्य:स्थितीत मनोरुग्णालयाकरीता समुपदेशकांचे पद मंजूर नाही.

मनोरुग्णालयात मनोविकार क्षेत्रातील मनोविकृतीतज्ञ, समाजसेवा अधीक्षक (मनोविकृती) तसेच मनोरुग्णतज्ञ परिचारिका यांच्याकडून मनोरुग्णांवर उपचार व त्यांचे समुपदेशन केले जाते.

मानकापूर (जि.नागपूर) येथे जिल्हा रुग्णालयाकरीता शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२५ अन्वये एकूण १९७ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन रिक्त पदे भरण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड व जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील गर्भवती महिलांचे वैद्यकीय सोयीसुविधांअभावी मृत्यू होत असल्याबाबत

**(४) * ४२७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील गालतरे येथील गर्भवती महिलेला प्रसुतीसाठी जव्हार उपजिल्हा रुग्णालयात दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान दाखल करण्यात आले असता पुरेशा सुविधा नसल्याने तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या महिलेचा व नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे तसेच मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील एका महिलेचा प्रसूतीनंतर रक्तस्त्राव झाल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा येथे सन २०२० ते सन २०२४ या कालावधीत ० ते ०१ वर्ष वयोगटातील ६८ तसेच ०१ ते ०५ वर्षे वयोगटातील १७ असे एकूण ८५ बालकांचा मृत्यू झाला आहे तसेच पालघर जिल्ह्यातील रुग्णालयांत अत्याधुनिक सुविधांचा अभाव असल्यामुळे एका वर्षात १४ हून अधिक महिलांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे, प्रसुतीकरीता आय.सी.यु., रक्त पेढी, इ. बाबींवर लक्ष केंद्रीत करुन मेळघाट पॅटर्न इतर आदिवासी जिल्ह्यात राबविण्याच्या दृष्टीने तसेच जव्हार येथे रुग्णालय बांधण्याची मागणी येथील लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महिला व बालविकास राज्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली असून, पालघर जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच जव्हार उपजिल्हा रुग्णालयात गर्भवती महिला व तिच्या नवजात बालकाच्या मृत्यू प्रकरणी दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

गालतारे येथील गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी दिनांक ३१/१२/२०२४ रोजी उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे दाखल करण्यात आले. सदर महिला HBsAg +ve असल्याने प्रसूती दरम्यान गुंतागुंत होत Amniotic Fluid Embolism या कारणामुळे त्यांच्या दिनांक १/०१/२०२५ मध्यरात्री १२.१० वाजता दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर लगेचच १२.२० वाजता तिच्या पोटातील असलेल्या गर्भाची व्हॅक्युम पंपाद्वारे प्रसूती करण्यात आली असून ते उपजत मृत असल्याचे आढळून आले.

मोखाडा तालुक्यातील गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे प्रसूती वेदना सुरु झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र मोऱ्हांडा येथे १०२ रुग्णवाहिकेने ग्रामीण रुग्णालय मोखाडा येथे संदर्भीत करण्यात आले होते. त्यानंतर तेथून पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे दाखल करण्यात आले होते. त्यांना प्रसूतीनंतर अति रक्तस्त्रावाचा त्रास होत असल्याने पुढील उपचाराकरीता जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे संदर्भित करण्यात आले असता, संदर्भ सेवे -दरम्यान रस्त्यात त्यांचा Haemorrhagic shock due to traumatic PPH and Atonic PPH with DIC या कारणामुळे दुर्दैवी मृत्यू झाला.

(२) हे अंशत: खरे आहे.

मोखाडा तालुक्यात सन २०२० ते २०२५ जानेवारी अखेर ० ते ०१ वर्ष वयोगटातील ६८ तसेच १ ते ०५ वर्षे वयोगटातील १७ असे एकूण ८५ बालमृत्यू झालेले आहेत.

पालघर जिल्ह्यात सन २०२४ - २५ या वर्षात जानेवारी, २०२५ अखेर १४ मातामृत्यू झाले आहेत. तथापि, पालघर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाच्या अधिपत्याखालील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथे शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार सर्व आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध आहेत. उपलब्ध आरोग्य विषयक सेवा व साधनसामुग्रीचा आवश्यकतेनुसार वापर करुन रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. कोणताही रुग्ण आरोग्य सेवेपासून तसेच आरोग्य सुविधांपासून वंचित राहिलेला नाही.

(३) पालघर जिल्ह्यातील वर्ग-१, वर्ग-२, सारासे गट-ब व वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ मधील एकूण-१४२ पदांपैकी ८६ पदे भरलेली असून, ५६ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमार्फत रिक्त पदांवर कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येते. तसेच IPHS अंतर्गत विशेषज्ञ अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येतात.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाच्या अधिपत्याखालील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथे शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार सर्व आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

तसेच पालघर जिल्ह्यात उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे ब्लड बँक कार्यन्वित आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय कासा, उप जिल्हा रुग्णालय डहाणू, ग्रामीण रुग्णालय, वाडा व ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे ब्लड स्टोरेज युनिट कार्यान्वित करण्यात आले आहे. तर ग्रामीण रुग्णालय पालघर येथे जिल्हा रक्त पेढी फेब्रुवारी, २०२५ पासून सुरु करण्यात आली आहे.

जव्हार, जि.पालघर येथे शासन निर्णय दिनांक २/०६/२०१२ अन्वये २०० खाटांचे सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक २०/०९/२०१९ अन्वये बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, जागा उपलब्ध झाली नसल्याने, जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे स्तरावरुन जागा उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच जव्हार, जि.पालघर हा आदिवासी भाग असल्याने, जव्हार येथे १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनीधी यांनी २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय पालघर येथे बांधण्यासाठी निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निकृष्ट दर्जाच्या औषधांची वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत तपासणी करण्याबाबत

**(५) * ८८६ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.पंकज भुजबळ, श्री.शशिकांत शिंदे, श्री.योगेश टिळेकर, श्री.राजहंस सिंह, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयांमध्ये चांगल्या दर्जाची व नामांकित कंपन्यांची औषधे पुरविण्यात यावीत व वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या औषधांच्या नमुन्यांच्या तपासणीत दोषी आढळणाऱ्यावर तसेच रुग्णांच्या डायलिसीस, सिटी स्कॅन, एमआरआय व रक्त चाचण्यांचा अहवाल येण्यास होणाऱ्या विलंबास जबाबदार दोषींवर समितीमार्फत कारवाई करण्याचे आदेश मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक रुग्णालयांनी औषधी तसेच इतर वैद्यकीय बाबींची स्थानिक खरेदी करताना आवश्यक निकषांची पूर्तता करावी याबाबत तसेच संबंधित उत्पादकांकडे जागतिक आरोग्य संघटनेने निर्देशित केलेले जीएमपी प्रमाणपत्र आवश्यक असावे याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये बोगस व निकृष्ट दर्जाच्या औषधांचा होणारा पुरवठा थांबविण्यासाठी संस्थास्तरावर स्थानिक खरेदी करतांना त्याबाबत दक्षता घेण्याकरीता वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागानेही दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशांची अंमलबजावणी करून राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये चांगल्या दर्जाची व नामांकित कंपन्यांची औषधे तसेच रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय.

(३) होय,

वैद्यकीय शिक्षण विभागाने दिनांक २०/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक खरेदी करतांना दक्षता घेण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

(४) सध्या महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत राज्यस्तरावर खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांच्या प्रत्येक समूह क्रमांकाची तपासणी करण्यात येते व त्यामध्ये औषधांच्या घटकांसह इतर गुणवत्ता निकष तपासले जातात. तसेच यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील गुणवत्ता नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावर चांगल्या दर्जाची औषधी विकत घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना सर्व जिल्ह्यांना देण्यात आल्या असून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(६) * १४७ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विक्रांत पाटील, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या महिला व बालकल्याण मंत्रालयाने सन २०१८ मध्ये सुरू केलेल्या ‘ॲनिमियामुक्त भारत’ मोहिमेतून राज्याला सन २०२१ ते २०२४ या कालावधीत ५००० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होऊनही मुंबईतील ७२.८ आणि मुंबई उपनगरातील ६५.६ टक्के मुले ॲनिमियाने ग्रस्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार राज्यात कुपोषित मुलांची टक्केवारी ४७.७ टक्के एवढी असून जळगाव जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२४ अखेर ७३२ बालके कुपोषित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करुनही मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी न होण्याची कारणे काय आहेत व कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

सन २०२१ ते २०२४ पर्यंतच्या कालावधीकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत बालकांच्या ॲनिमियाचे व्यवस्थापन करण्यासाठी एकूण रुपये १६६.४८ कोटी अनुदान मंजूर झालेले आहे.

तसेच, मुंबईतील ७२.८ आणि मुंबई उपनगरातील ६५.६ टक्के मुले ॲनिमियाने ग्रस्त असल्याची आकडेवारी डिसेंबर, २०२४ ची नसून ही एनएफएचएस-५(२०१९) मधील आहे.

(२) पोषण ट्रॅकरवरील माहे जानेवारी, २०२५ च्या माहितीनुसार संपूर्ण राज्याची व जळगाव जिल्ह्याची पोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| क्षेत्र | Total Active Children measured (Height & Weight) | SAM (N) | SAM (%) | MAM (N) | MAM (%) |
|---|---|---|---|---|---|
| राज्य | ४८१६०१० | ३४७९५ | ०.७२ | १५५९६८ | ३.२४ |
| जळगांव | २२२९१३ | ९५३ | ०.४३ | ६०४८ | २.७१ |

(३) कुपोषणाची कारणे खालीलप्रमाणे आहेत:- १) गरोदर मातांचे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण जास्त आहे.
२) बालविवाह.
३) विटभट्टीवरील कामगार.
४) ऋतुमानानुसार आजार.
५) बाळंतपणा वेळेसची गुंतागुत.
६) गरोदर मातेमध्ये सुक्ष्म पोषक द्रव्यांचे प्रमाण कमी असणे.
७) वेळेपूर्वी प्रसूती.
८) चुकीच्या आहार पध्दती.
९) स्वच्छता आणि योग्य आहार याबाबत पालक जागरूक नसणे.
१०) जन्मतः बालकाचे वजन कमी असणे.

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर महिला व स्तनदा माता यांना THR व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) आदिवासी प्रकल्पामध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून या योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार तर ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

३) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये सॅम बालकांना Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो. तसेच आरोग्य खात्यामार्फत आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनाथ प्रमाणपत्र पडताळणी समितीची स्थापना करण्याबाबत

**(७) * ८०६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये अनाथ प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी महिला व बालविकास विभागाची काही प्रमाणपत्रे चुकीच्या पध्दतीने वाटप करण्यात आली असून एकल पालक असलेल्यांनी देखील या आरक्षणाचा लाभ घेतल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, अनाथ प्रमाणपत्र वाटपात होत असलेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या धर्तीवर विभागीय स्तरावर अनाथ प्रमाणपत्र पडताळणी समितीची स्थापना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ज्या प्रमाणपत्रांबाबत तक्रारी येत आहेत ती प्रमाणपत्रे रद्द करण्याबाबत तसेच अनाथ प्रमाणपत्र वाटपात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी अनाथ प्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

याबाबतची कोणतीही तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक ६ एप्रिल २०२३ मधील मुद्दा क्र. ३ (०४) मधील तरतुदीनुसार विभागीय उपआयुक्त कार्यालयाने निर्गमित केलेले अनाथ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असून महिला व बालविकास आयुक्तालयाच्या दिनांक २२ मे, २०२४ रोजीच्या आदेशान्वये अनाथ प्रमाणपत्र पडताळणीकरीता मा.आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीद्वारे अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येत आहे. त्यामुळे अनाथ प्रमाणपत्र पडताळणीकरीता जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या धर्तीवर विभागीय स्तरावर वेगळ्याने अनाथ प्रमाणपत्र पडताळणी समितीची स्थापना करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात एम.बी.बी.एस. व्दितीय वर्षाच्या अंतिम परिक्षेचे पेपर फुटीबाबत

**(८) * ४०४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घेण्यात आलेल्या एम.बी.बी.एस. द्वितीय वर्षाच्या अंतिम परिक्षेच्या प्रश्नपत्रिका दिनांक २ डिसेंबर ते ९ डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान फुटली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फार्माकॉलॉजी (१) हा पेपर दिनांक २ डिसेंबरला फुटल्यामुळे तो १९ डिसेंबरला पुन्हा घेण्यात आला तसेच दिनांक ४ डिसेंबर, २०२४ ला फार्माकॉलॉजी (२) हा पेपर फुटल्यामुळे नवीन सेट नुसार परीक्षा घेण्यात आली तसेच पॅथॉलॉजी (२) हा पेपर ९ डिसेंबरला फुटल्यामुळे दोन तास उशीरा परीक्षा सुरु करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एम.बी.बी.एस द्वितीय वर्षाच्या अंतिम परिक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून याप्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

दिनांक ०२/१२/२०२४ रोजीचा फार्माकॉलॉजी-१ आणि दिनांक ०९/१२/२०२४ रोजीचा पॅथॉलॉजी-२ हे पेपर फुटल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, दिनांक ०४/१२/२०२४ रोजीचा फार्माकॉलॉजी - २ हा पेपर फुटलेला नसून, विद्यापीठामार्फत खबरदारीचा उपाय म्हणून, नवीन प्रश्नपत्रिका सर्व परीक्षा केंद्रांवर ई-मेलद्वारे पाठविण्यात येवून, त्याच दिवशी परीक्षा घेण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत फार्माकॉलॉजी-१ व पॅथॉलॉजी-२ या विषयांच्या पेपर फुटींच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक ४/१२/२०२४ व दिनांक १०/१२/२०२४ रोजी म्हसरुळ पोलीस, ठाणे नाशिक येथे भारतीय न्यायसंहिता कलम ३१८ (४), ६२ सह महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विर्निदिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम, १९८२ च्या कलम ६ अन्वये गुन्हा नोंद करुन अनुक्रमे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.II/२९४ व क्र.I/३०१ दाखल करण्यात आले आहेत. तसेच याबाबत म्हसरुळ पोलीस स्टेशनमार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(९)** ***११४ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने मर्जीतल्या ठेकेदारांना काम मिळावे यासाठी जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांची निविदा प्रसिध्द होण्यापुर्वीच उप अभियंतासह मर्जीतील ठेकेदाराने काढलेले जीपीएस छायाचित्र निविदेमध्ये जोडून नियमांचे उल्लंघन व गोपनियतेचा भंग केल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील २२ कोटी ३५ लाख रुपयांची ७९ कामे इतर शासकीय योजनांमध्ये समाविष्ट असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी ग्रामविकास विभागाकडे तक्रार केल्यानंतर दुबार कामे टाळण्याच्या दृष्टीने दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान सदर कामांना स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामांची पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही जिल्हा परिषदेने निविदा राबविण्याच्या घेतलेल्या निर्णयाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे नाही.

सदरची कामे पुरहानी लेखाशीर्ष मधील असल्याने ई-निविदेमध्ये ठेकेदार व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेची स्थळपाहणी करुन जीपीएस आधारीत छायाचित्र संबंधित ठेकेदार व उप अभियंता यांच्या प्रमाणपत्रासह जोडणेबाबतची अट अंतर्भूत होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या विभागाकडील दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये द्विरुक्ती आढळल्यास कामे रद्द करुन अथवा कामांच्या प्रशासकीय मान्यता शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन शासनाकडून कामे बदलून घेण्याची दक्षता घेण्यात यावी, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) कार्यकारी अभियंता, सां. बां. विभाग, जव्हार यांनी फेर तपासणी व स्थळ पाहणी करुन सादर केलेला अहवाल जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १७/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विभागास सादर केला आहे. सदर अहवालाप्रमाणे ७९ कामांपैकी ६९ कामांची द्विरुक्ती झाली नसून १० कामे नवीन सुचविलेल्या नावाप्रमाणे अंशत: बदल/साखळी क्रमांकात बदल करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली आहेत. सदर ६९ कामांची केवळ निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून अद्यापपर्यंत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वागळे इस्टेट (जि.ठाणे) येथील लुमिस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कर्मचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आल्याबाबत

**(१०) * २१९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वागळे इस्टेट (जि.ठाणे) येथील इंडस्ट्रीयल इस्टेट स्थित लुमिस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड या पशुखाद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीत कर्मचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आली असून, कंपनीत पशुखाद्य हाताळताना कर्मचाऱ्यांना सातत्याने गंभीर जखमा होत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून कंपनीतील कर्मचाऱ्यांना सुरक्षेच्या आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

वागळे इस्टेट (जि.ठाणे) येथील इंडस्ट्रीयल इस्टेट स्थित लुमिस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड या पशु खाद्य करणाऱ्या कारखान्यात माहे ऑक्टोबर-२०२४ मध्ये दोन कामगारांना ॲलर्जीमुळे हाताच्या त्वचेला किरकोळ स्वरुपात लाल होणे, खाज येणे असा त्रास झाला होता.सदर त्रास हा प्रथमोपचाराने बरा झाला.
(२) सदर कारखान्यात वापरण्यात येणारी कच्चा व पक्या मालाची डस्ट उत्पादन प्रक्रियेदरम्यान पसरते. मालाच्या गुणधर्मानुसार डस्ट त्वचेच्या संपर्कात आल्यास ॲलर्जीमुळे त्रास होण्याची शक्यता असते. सदर ठिकाणी कामगारांना मास्क, दोन प्रकारचे (प्लॅस्टीक व सर्जिकल) हॅंड ग्लोव्हज, स्किन टच फुल स्लीव्हज टी शर्टस, प्रोटेक्टीव्ह फुल बॉडी सुट इत्यादी सुरक्षा साधने पुरविण्यात येतात.

तथापि, उत्पादन विभागात कच्या व पक्या मालाच्या डस्टला कार्यस्थळावर पसरण्यापासून प्रतिबंधित करण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम-७-ए (२)(ए) तरतुदीचा भंग झाल्याचे आढळुन आला. तसेच वापरात असलेल्या दोन ब्लेंडर्सना नियमाप्रमाणे आवश्यक सेफ्टी गार्ड लावण्यात आले नसल्याने कलम २१(१)(iv)(सी) तरतुदीचा भंग झाल्याचे आढळुन आले. वरील दोन्ही भंगांकरीता भोगवटादाराविरुध्द एक खटला दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ व वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील वीस गावांकरीता मंजूर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(११) * ४५५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ व वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील २० गावांची पाणीटंचाई दूर करण्याकरीता शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत रुपये २८ कोटी इतका खर्च करून सिद्धेश्वर जलाशयातून वीसगाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली असून, सदर योजनेच्या सुरुवातीचा काही काळ वगळता नंतरच्या काळात विविध कारणांमुळे या योजनेचे पाणी गावांपर्यंत पोहोचत नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करुनही सदरहू पाणीपुरवठा योजना बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औंढा नागनाथ व वसमत तालुक्यातील वीस गावांना पाणीपुरवठा करणारी व सद्य:स्थितीत बंद असलेली योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्हयांतर्गत औंढा नागनाथ व वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील २० गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी २० गावे पुरजळ या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात येवून जिल्हा परिषद हिंगोली यांच्याकडे सदर योजना हस्तांतरीत करण्यात

आली. सदर योजनेची विद्युत देयकांची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे काही काळ बंद असलेली योजना चालु ठेवण्यासाठी जिल्हा परिषद हिंगोली यांच्यामार्फत वीज देयकाचा भरणा करुन योजना कार्यान्वित करण्यात आली.

सदर २० गावांपैकी जवळाबाजार व शिरडशहापूर, ता.औंढा नागनाथ या गावांसाठी जल जीवन मिशन अंतर्गत संयुक्त पाणीपुरवठा योजना (रेट्रोफीटींग) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. तसेच औंढा नागनाथ करीता नगर पंचायतीमार्फत स्वतंत्र नविन पाणीपुरवठा योजना घेण्यात आली असून उर्वरीत १७ गावांना ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजनेची कामे मंजूर करण्यात आली असून सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विदर्भ व मराठवाड्यातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * २३५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॅगच्या आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ च्या अहवालानुसार राज्यातील आरोग्य विभागांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची २२ टक्के, परिचारिकांची ३५ टक्के व इतर वैद्यकीय कर्मचारी यांची २९ टक्के पदे रिक्त असून यवतमाळ जिल्ह्यात ४४ व गडचिरोली जिल्ह्यात ३८ टक्के वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने विदर्भातील अनेक शासकीय रुग्णालयातून गरजू रुग्णांना उपचाराविना परतावे लागत आहे, मराठवाड्यात ३० टक्के वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून सरासरी १४,००० रुग्णामागे १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालयात मोठ्या प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियमित पदे, स्त्रीरोगतज्ञांची १४ पदे व इतरही विभागांत मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील आरोग्य विभागात डॉक्टर व कर्मचाऱ्यांची एकूण १ हजार ५४ पदे मंजूर असतानाही त्यापैकी केवळ ५९८ पदे भरलेली असून ४५६ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये मनुष्यबळ व सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१३-१४ या कालावधीत तयार करण्यात आलेल्या "मास्टर प्लॅन" नुसार माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत ७० टक्के मनुष्यबळ व सोयीसुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील डॉक्टरांची नियमित पदे भरण्यासाठी तसेच आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी व मनुष्यबळ कमतरता दूर करण्यासाठी शासनाकडून कोणती विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील रिक्त असणारी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य संस्थेत उपलब्ध वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून रूग्णांना उपलब्ध सर्व सुविधांसह रुग्णसेवा प्रदान करण्यात येते.

(२) भंडारा जिल्ह्यातील आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १६२५ पदे मंजूर असून १२१३ पदे भरलेली आहेत व ४१२ पदे रिक्त आहेत.तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची ६७ पदे मंजूर असून ३८ पदे भरलेली व २९ पदे रिक्त आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन-२०११ च्या लोकसंख्येच्या आधारे राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यास शासनाने शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ व दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये मंजूरी दिली. त्यानुसार राज्यात जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र २७१ व उपकेंद्र ९०१ संस्था मंजूर करण्यात आल्या आहेत.

२७१ प्राथमिक आरोग्य केंद्रापैंकी १७२ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून ४६ प्रा.आ.कें. चे बांधकाम सुरू आहे. तसेच ९०१ उपकेंद्रापैकी ४५७ उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले असून १७७ उपकेंद्राचे बांधकाम सुरू आहे. उर्वरित संस्थेच्या बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन बांधकामे जिल्हा नियोजन अथवा १५ वित्त आयोगामधून प्रस्तावित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. ३५२ उपकेंद्रामध्ये पदनिर्मिती झालेली आहे व १७२ प्रा.आ. कें. मध्ये पदनिर्मिती झालेली आहे.

आवश्यक सोयीसुविधांसह वरील संस्था कार्यान्वित झालेल्या आहेत.

(४) व (५) वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) ची १७२९ रिक्त पदे भरण्याची जाहिरात दिनांक ३१/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

संचालक मुंबई हे पद म.लो.आ. च्या शिफारशीनुसार भरण्यात आले आहे. उपसंचालक संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील १२ पदे व पदोन्नतीच्या कोट्यातील ०९ पदे भरण्यात आली आहेत. तसेच, जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, विशेषज्ञ संवर्गातील २२६ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, विशेषज्ञ संवर्गातील अनुक्रमे २२५, ३३, ९५ पदांची जाहिरात म.लो.आ. ने माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये प्रसिध्द केली आहे. पदोन्नतीच्या कोट्यातील पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त कार्यरत गट- क व गट-ड संवर्गातील १०९४९ रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सन २०२४ मध्ये सदर भरती प्रक्रियेतून गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या ९६१८ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांना लाडकी बहिण योजनेचा प्रोत्साहन भत्ता वितरीत करण्याबाबत

(१३) * २९८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.अनिल परब, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : **सन्माननीय** महिला व बालविकास मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्य शासनाने माहे जुलै ते डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्रत्येक अर्जामागे ५० रुपये प्रोत्साहन भत्ता/मोबदला देण्याचे जाहीर करूनही सदर भत्ता/मोबदला अंगणवाडी सेविकांना अद्याप मिळालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रोत्साहन भत्ता/मोबदला अंगणवाडी सेविकांना देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अंगणवाडी सेविका/अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्यासाठी रुपये ३१.३३ कोटी इतका निधी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अंगणवाडी सेविका/अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताडाळी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक वसाहतीतील ओमॅट वेस्ट लिमिटेड कंपनीमध्ये मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१४) *५५३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडाळी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक वसाहतीतील ओमॅट वेस्ट लिमिटेड या कंपनीमध्ये दिनांक १३ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता २० फुट उंचीवरुन २०० किलो स्टील स्क्रॅप अंगावर पडल्याने अजय रवींद्र राम (रा. बिहार) या कामगाराचा मृत्यू झाला असून, सदर कामगाराच्या वारसदारांना कुठलाही मोबदला न देता कंपनी व्यवस्थापनाने परस्पर मृतदेह त्याच्या मूळगावी पाठवून दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीमध्ये श्यामसुंदर ठेंगणे या कामगाराचा देखिल दिनांक २३ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास अपघाती मृत्यू झाला असून त्यांच्या वारसदारांना नुकसानभरपाई म्हणून देय असलेले १५ लक्ष रुपये कंपनीने अद्याप दिले नाहीत तसेच या कंपनीत आतापर्यंत अनेक कामगारांचा सुरक्षाव्यवस्थेअभावी मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कंपनीकडून कामगारांना सुरक्षेच्या दृष्टीने नियमानुसार पुरेशी सुरक्षात्मक साधन-सामुग्री पुरविण्यात आलेली नाही तसेच सुरक्षा अधिकारी (सेफ्टी ऑफीसर) सुध्दा नेमण्यात आलेला नसतानाही सदर कंपनी विरोधात अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कंपनीतील दोन्ही मयत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच सदरहू दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या कंपनी व्यवस्थापकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कंपनीची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

ओमॅट वेस्ट लिमिटेड या कंपनीत दिनांक १३ ऑक्टोबर, २०२४ रोजी अंदाजे २३ फुट उंचीवरून स्टिल स्क्रॅप अंगावर पडल्याने श्री.अजय रविंद्र राम (रा. बिहार) या कामगाराचा मृत्यू झाला. सदर कामगार राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांचे वारसदारांना नियमानुसार लाभ मिळणेबाबत पाठपुरावा सुरू आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगारांच्या वारसास अर्थिक मदत म्हणून रुपये २ लाख सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २३ जून, २०२४ रोजी श्री.श्यामसुंदर नत्थुजी ठेंगणे या कामगाराचा कारखान्यात काम करीत असताना अपघाती मृत्यू झालेला होता.सदर कामगार राज्य विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांची पत्नी यांना रुपये २०१.८६ प्रति दिवस, मुलगा व मुलगी यांना प्रत्येकी रुपये १३४.५७ प्रति दिवस लाभ दिनांक २४ जून, २०२४ पासून राज्य कामगार कार्यालयाकडून मंजूर झालेला आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगाराच्या वारसास अर्थिक मदत म्हणून रुपये ३० लाख सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आले आहेत.

याआधी दिनांक १६ जून, २०२२ रोजी श्री.निकलेश हरीराम इनवटे या कामगाराचा मृत्यू झालेला आहे. तसेच दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी कारखान्यात अपघात घडून श्री.सिकंदर यादव गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी या कामगाराचा मृत्यू झाला होता.

(३) अंशत: खरे आहे.

कारखान्यात वेळोवेळी घडलेल्या अपघाताच्या अनुषंगाने कारखान्याच्या भोगवटादार तसेच व्यवस्थापक यांचेविरूध्द कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, चंद्रपूर यांच्या न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

कारखाना व्यवस्थापनाकडून प्राप्त माहितीनुसार कारखान्यात २ सुरक्षा अधिकाऱ्यांची (सेफ्टी ऑफीसर) नेमणूक करण्यात आली आहे.

(४) कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगार श्री.अजय रविंद्र राम यांच्या वारसास अर्थिक मदत म्हणून रुपये २ लाख सानुग्रह अनुदान देण्यात आले आहेत. तसेच सदर कामगार राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्यामुळे त्यांच्या वारसास नियमानुसार लाभ मिळणेबाबत पाठपुरावा सुरू आहे.

दुसरे मृत कामगार श्री.श्यामसुंदर ठेंगणे यांच्या वारसास अर्थिक मदत म्हणून रुपये ३० लाख सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. सदर कामगार राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्याने

त्यांचे पत्नी यांना रुपये २०१.८६ प्रति दिवस, मुलगा व मुलगी यांना प्रत्येकी रुपये १३४.५७ प्रति दिवस लाभ दिनांक २४/०६/२०२४ पासून राज्य कामगार कार्यालयाकडून मंजूर झालेला आहे.

सदर दोन्ही अपघातांबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशीदरम्यान आढळून आलेल्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय चंद्रपूर यांच्या न्यायालयात कारखान्याचे भोगवटादार यांचे विरूध्द एकूण ३ फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मराठी भाषा भवनाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१५) * २७८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, ॲड.अनिल परब : **सन्माननीय** मराठी भाषा मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) चर्नी रोड (मुंबई) येथे मराठी भाषा भवन इमारतीच्या बांधकामाचे भुमिपूजन दिनांक २ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यादरम्यान झाले असून इमारतीच्या बांधकामासाठी रुपये १२६ कोटींचा निधी मंजूर असूनही अद्याप कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमिपूजनास २ वर्षांचा कालावधी होऊनही बांधकामास सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत तसेच मराठी भाषा भवनाचे काम मुदतीत पूर्ण न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण यांच्याकडील भूखंडांचे एकत्रिकरण आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग व मराठी भाषा विभाग यांच्याकडील भूखंडांच्या आराखड्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. सदर बांधकामास दिनांक १.०३.२०२४ अन्वये रुपये १५०.१४ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून रुपये १०८.७३ कोटी इतक्या रकमेची निविदा प्रक्रिया राबवून दिनांक ९/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित केले आहेत. सदर जागेवरील जुनी इमारत पाडण्याचे काम पूर्ण होत आले असून शोअर पाईलिंगचे काम सुरु आहे.

-----------------

## दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना ग्रामपंचायत स्तरावरुन दाखले देण्याच्या मागणीबाबत

**(१६) * ८४७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना ग्रामपंचायत कार्यालयातून दारिद्रयरेषेखालील दाखले दिले जात होते, परंतु माहे फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार दारिद्रयरेषेखालील दाखले ग्रामपंचायतीद्वारे न देता सहायक गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने पंचायत समितीद्वारे दिले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दाखले घेण्यासाठी ग्रामस्थांना २० ते ३० कि.मी. अंतरावरुन तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या पंचायत समिती कार्यालयात जावे लागत असून गटविकास अधिकारी सुट्टीवर किंवा प्रशिक्षणास गेल्यास लाभार्थींना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दारिद्रयरेषेखालील धारकांच्या समस्या लक्षात घेता उक्त शासन निर्णयात बदल करुन पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयात दाखले देणाच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) हे खरे नाही.

या विभागाच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या अधिसुचनेन्वये राज्यातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना दाखले देण्याकरीता सहायक गटविकास अधिकारी यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले होते.

या विभागाने दि ७ डिसेंबर, २०२० रोजीच्या अधिसुचनेन्वये त्यात सुधारणा केली असून त्यानुसार दारिद्रयरेषेखालील दाखले देण्याकरीता ग्रामपंचायत अधिकारी यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे सदर दाखले ग्रामपंचायत स्तरावर देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते क्रमांकाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(१७) * ७८८ श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते कामासाठी ग्रामीण मार्ग क्रमांक मिळण्यासाठी २५० रस्त्यांचा प्रस्ताव एक वर्षांपूर्वी जिल्हा परिषद अकोला यांच्याकडून शासनास पाठविल्यानंतर अद्याप सदर रस्त्यांना ग्रामीण मार्ग क्रमांक मिळाले नसल्याने तसेच रस्त्याची कामे प्रलंबित असल्यामुळे सर्वसामान्य जनतेची गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांना ग्रामीण मार्ग क्रमांक देऊन रस्त्यांची कामे जलद गतीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यातील १८८ योजनाबाह्य रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा प्रस्ताव माहे ऑगस्ट-२०२४ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने त्याबाबतचा पुर्तता अहवाल माहे सप्टेंबर-२०२४ मध्ये क्षेत्रिय कार्यालयाकडून मागविण्यात आला आहे. सदर त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे. सदरचा त्रुटी पुर्तता अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातीत पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१८) * ९४१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक २३६०८ ला दिनांक १ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात मागील अनेक वर्षांपासून पंचगंगा नदीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असून हजारो हेक्टर शेती नापीक झाली असल्याचे तसेच दोन वर्षांपूर्वी पंचगंगा प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा परिषदेने सादर केलेला रुपये २५२ कोटींचा प्रस्ताव शासनाने नामंजूर केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हा प्रशासनाने पंचगंगा नदीच्या प्रदूषणावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नव्याने प्रस्ताव करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नागरिकांचे आरोग्य निरोगी ठेवण्याकरीता पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत तसेच शासनाकडे प्रलंबित असलेल्या उक्त प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) हे खरे नाही.

पंचगंगा नदीच्या प्रदूषण निर्मुलनाबाबत सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी हा स्वच्छ भारत मिशन (ग्रा.), ग्रामपंचायत, १५ व्या वित्त आयोगाचा निधी, जिल्हा नियोजन समिती व पर्यावरण विभाग इ. विभागांच्या तरतुदीमधून उपलब्ध करुन घेण्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक २४/०१/२०२४ व दिनांक २४/०२/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विष्णुपुरी (ता.जि.नांदेड) येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सिटी स्कॅन मशिन बंद असल्याबाबत

(१९) * ६६६ श्री.हेमंत पाटील : **सन्माननीय** वैद्यकीय शिक्षण मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) विष्णुपुरी (ता.जि.नांदेड) येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन माहे ऑगस्ट, २०२३ पासून बंद असून येथील रुग्णांना बाहेर खाजगी रुग्णालयात पाठविण्यात येत असल्याने रुग्णांची गैरसोय होऊन त्यांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन शासनाने उक्त रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन तात्काळ सुरू करण्याच्या दृष्टीने वा नवीन मशीन उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच याबाबत दिरंगाई करणाऱ्या रुग्णालय प्रशासनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे

(२) M/s. Erbis Engineering Co.,Ltd., Mumbai या कंपनीने सदर यंत्राचा पार्ट बदलून सदर यंत्र सुरु करता येईल किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येत आहे. तसेच, नवीन सी.टी.स्कॅन मशीन जिल्हा वार्षिक योजनेतून खरेदी करण्याची कार्यवाही सुरु असून त्यानुषंगाने पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालयीन यांत्रिकी स्वच्छतासेवा निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२०) * ६९० ॲड.अनिल परब : **सन्माननीय** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागात रुग्णालयीन यांत्रिकी स्वच्छता सेवा निविदा ही बी.एस.ए. कॉर्पोरेशन लि.पुणे ह्या एकाच कंपनीला स्वच्छता सेवा पुरविण्याचा कुठलाही अनुभव नसतानाही नियमबाहय पध्दतीने देऊन गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६३८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान काढून मोठ्या प्रमाणात अनियमितता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा नोटीसमधील अटीनुसार सदरहू काम राज्यातील कुठल्याही कंपनीने फक्त ४ विभागामध्येच करावे असा उल्लेख असतानादेखील बी.एस.ए. कॉर्पोरेशन लि.पुणे यांना संपूर्ण राज्याचे ८ आरोग्य परिमंडळाचे काम कार्यादेश नसतानाही देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या दोषींविरुध्द कारवाई करुन सदर आदेश रद्द करुन संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

निविदेमधील अनुभवाच्या अटी व शर्तीनुसार पात्र ठरलेला निविदाकार मे.बी.एस.ए.कॉर्पोरेशन प्रा.लि., पुणे यांना दिनांक ०३/०९/२०२४ रोजी Letter of Intent देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांमध्ये गट-क व गट-ड संवर्गातील पदभरतीकरीता नियुक्त सेवापुरवठादारांची चौकशी करण्याबाबत

(२१) * ९०० श्री.अंबादास दानवे : **सन्माननीय** वैद्यकीय शिक्षण मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासनाच्या ५९ संस्थांमध्ये गट-क व गट-ड या संवर्गातील एकूण ६८३० पदे बाह्यस्त्रोतामार्फत उपलब्ध करुन देण्यासाठी अटी व शर्तीनुसार निकषात बसत नसलेल्या सेवापुरवठादारांना नियुक्तीचे आदेश देण्यात आल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सेवा पुरवठादारांनी प्रत्येक संस्थेमध्ये कर्मचाऱ्यांची पदानुसार शैक्षणिक पात्रता नसतानाही नियुक्ती केल्याने त्याबाबतच्या तक्रारी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सेवा पुरवठादारांचे नियुक्तीचे आदेश रद्द करुन पुनर्निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर,जि.जळगाव) तीर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(२२) * ९०३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र मंदिर बांधकामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांनी दिनांक १४ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही सदर मंदिराचे बांधकामासाठी आवश्यक निधी शासनाकडून अप्राप्त असल्याने संत मुक्ताई मंदिराचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव येथील संत मुक्ताई मंदिराच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे,

प्रस्तावाव्दारे संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या तिर्थक्षेत्राच्या जिर्णोधारासाठी निधीची मागणी केली आहे.मात्र,सदर प्रस्ताव हा नियोजन विभागाच्या दिनांक ०४/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घेऊन सादर करण्यात आलेला नाही. प्रस्ताव विहित पध्दतीने प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) यापूर्वी,श्री संत मुक्ताई मंदिर, कोथळी, ता.मुक्ताईनगर जि.जळगाव या तीर्थक्षेत्रास या विभागाकडून सन २०१८ मध्ये रुपये ९.०८ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देवून संपूर्ण निधी वितरीत केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील एच.एम.पी.व्ही. व जी.बी.एस. हे संसर्गजन्य आजार रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * ९३७ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतासह जागतिक स्तरावर एचएमपीव्हीचा प्रसार झाल्यामुळे विविध देशांमध्ये एच.एम.पी.व्ही.शी संबंधित श्वसन आजारांचे रुग्ण आढळून आले असून देशातील विविध राज्यांमध्ये एच.एम.पी.व्ही. या संसर्गजन्य रोगाचे ५ रुग्ण आढळल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: पुणे, सोलापूर, नांदेड व अन्य जिल्ह्यात गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीसी) या आजाराने अनेक रुग्ण बाधित झाले असून पुणे येथे गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) या आजाराने एका ६७ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) या आजाराची लक्षणे दूषित पाण्यामुळे वाढत असल्याचा निष्कर्ष आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केला असून, सदर आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्यातील पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, कोरोना काळात राज्यातील आरोग्य यंत्रणा सुसज्ज नसल्याने अनेक नागरिकांचा मृत्यू झाला होता हे पाहता “एचएमपीव्ही” व जी.बी.एस. च्या बाबतीत पुनरावृत्ती होऊ नये याकरीता तसेच सदर आजार रोखण्याबाबत तसेच या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

एचएमपीव्ही हा विषाणूजन्य आजार नविन नसून तो पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. या आजारामुळे बाधित रुग्णास बहुतांश सौम्य आजार होतो.
(२) होय हे अंशतः खरे असून एका महिलेचा मृत्यू झाला आहे.
(३) बाधित भागातील पाण्याचे नमुने निश्चित केलेल्या प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. GBS हे आजार AUTO IMMUNE असून काही इन्फेक्शन मुळे ट्रिगर होऊ शकतात. या मुळे शासनाकडून सर्व जिल्ह्यांना पाणी स्वच्छता सह इतरही मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) १) जी.बी.एस. व एच.एम.पी.व्ही. या सारख्या संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरीय शीघ्र प्रतिसाद पथक कार्यरत केले आहे.

२) सर्व स्तरावरुन जनतेला आरोग्य शिक्षण देण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सर्व जिल्ह्यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत**

**(२४) * ४४९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे** : **सन्माननीय** मराठी भाषा मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी मान्यता देऊनही शासनाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषेचा वापर सर्व स्तरावर होण्याबाबत तसेच सदर शासन निर्णय त्वरित निर्गमित होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्र. फा.सं-एकेडी-२६/२/२०१९/ अकादमी, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये मराठी भाषेस अभिजात भाषा चा दर्जा प्राप्त झाला आहे.

मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र शासनाकडून क्रमप्राप्त असलेले लाभ मिळविणे तसेच भाषेचा प्रचार, प्रसार व संशोधन अपेक्षित आहे. यासाठी ज्येष्ठ साहित्यिक व तज्ञांची समिती गठीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.

येत्या २५ वर्षात मराठी भाषा रोजगाराची व ज्ञानाची भाषा व्हावी म्हणून मराठी भाषेचा वापर सर्व स्तरावर होण्याच्या अनुषंगाने मराठी भाषा विभागाच्या दिनांक १४/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण ठरविण्यात आले असून त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरु आहे.

-----------------

**रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हिल (इंडिया) व्यवस्थापनाने कंपनीच्या उपहारगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा न केल्याबाबत**

**(२५) * ३२३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हिल (इंडिया) कंपनीच्या व्यवस्थापनाने कंपनीमधील उपहारगृहात काम करणाऱ्या ३७ कामगारांना ३२ महिन्यांपासून वेतन अदा केले नसल्यामुळे तसेच अत्यावश्यक सुविधा प्रलंबित ठेवल्यामुळे येथील संतप्त कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाविरुध्द बेमुदत आंदोलन सुरु केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना थकित वेतनासह अत्यावश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली तसेच वेतन प्रलंबित ठेवणाऱ्या व्यवस्थापनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

ऑक्टोबर, २०२२ पासून वेतन अदा न केल्याने कामगारांनी दिनांक २६/१२/२०२४ पासून गेट बंद आंदोलन सुरू केले होते. तथापि, व्यवस्थापनाबरोबर चर्चा झालेनंतर दिनांक २७/०१/२०२५ पासून कामगारांनी सदर आंदोलन मागे घेतलेले आहे.
(२) कामगारांना वेतन मिळाले नसल्याबाबतची तक्रार कामगार विभागास प्राप्त झालेली नाही. तथापि, सदरहू प्रश्न प्राप्त झाल्यानंतर संबंधित आस्थापनेस वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत दिनांक २४/०२/२०२५ रोजी निरीक्षण शेरे पारित करण्यात आलेले आहेत. विहित मुदतीमध्ये पुर्तता न केल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ससून रुग्णालय (जि.पुणे) येथे मंजूर कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत

**(२६) * ११५१ श्री.योगेश टिळेकर** : **सन्माननीय** वैद्यकीय शिक्षण मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यातील कर्करोग रुग्णांचा भार मुंबईतील टाटा रुग्णालय व छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयावर पडत असल्याने पुणे येथील ससून रुग्णालयाच्या आवारातील सव्वादोन एकर जागेवर एक कर्करोग रुग्णालय उभारण्याकरीता शासनाने ११ वर्षांपूर्वी परवानगी देऊन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची जागा उपलब्ध करुन दिली असतानाही सदरहू रुग्णालय उभारणीच्या कामाला सुरुवात झाली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ससून रुग्णालयाचे तत्कालीन अधिष्ठाता यांनी या जागेत साडेतीनशे कोटी रुपये खर्च करून स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याच्या प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून अद्यापपर्यंत सदर प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची जागा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) खासगी व्यावसायिकाला भाडे तत्वावर देण्याचे प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक गुंतागुंतीच्या कर्करोगाच्या उपचारासाठी रुग्णांना इतर स्पेशालिस्ट डॉक्टरांचा लाखो रुपयांचा औषधोपचार खर्च परवडत नसल्याने ससून येथे उक्त कर्करोग रुग्णालय उभारल्यास या रुग्णांना उपचार घेणे साईचे होईल याकरीता ससून येथे कर्करोग रुग्णालय उभारण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची जागा अद्याप हस्तांतरीत न झाल्याने सदर प्रस्तावास मान्यता आदेश देण्यात आलेली नाही.

(४) कॅन्सर संबंधित देण्यात येणाऱ्या सुविधांचा दर्जा वाढविण्याकरीता आसाम राज्य सरकारने अवलंब केलेल्या तीन स्तरीय कॅन्सर केअर मॉडेल राबविणेबाबत प्रस्ताव विधाराधीन असून त्यात पुणे जिल्ह्याचा समावेश आहे.

(५) लागू नाही

-----------------

## राज्यातील नि:शुल्क प्रयोगशाळा (महालॅब) योजनेतंर्गत रुग्णांची फसवणूक करून आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * ११७० श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नि:शुल्क प्रयोगशाळा चाचणी निदान योजना मागील पाच ते सहा वर्षे सुरु असून खाजगी लॅबमध्ये तपासणीसाठी रुग्ण गेले असता त्यांच्याकडून अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्यामुळे उक्त मोफत योजनेतून रक्त चाचण्या करण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतंर्गत रक्त चाचण्या व विविध आजारांच्या जनुकिय क्रमनिर्धारणासाठी सुरु करण्यात आलेल्या बऱ्याच प्रयोगशाळामधील साहित्य खराब असून रक्त तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना खोटे अहवाल देऊन योजनेतील डॉक्टरांच्या संगनमताने बांधकाम कामगार, गर्भवती महिला व अन्य रुग्णांना कॅन्सर तसेच इतर आजार दाखवून पैसे घेण्यात येऊन रुग्णांची फसवणूक केली जात असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कामगारवर्गासाठी राबविल्या जाणाऱ्या जनकल्याण योजनेंतर्गत कामगारांच्या विविध रक्त तपासण्या व चाचण्या केल्या जात असून सदर योजनेमध्ये एजन्सीमार्फत हजारो बोगस रुग्ण व बोगस रिपोर्टस दाखवून प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नि:शुल्क प्रयोगशाळा चाचणी निदान योजनेतून रुग्णांना अचूक अहवाल मिळण्याच्या दृष्टीने तसेच रुग्णांची फसवणूक होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली तसेच कामगार वर्गाच्या या कल्याणकारी योजनेमध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधितांवर तसेच ही योजना चालविणाऱ्या एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, अशा प्रकारची एक घटना निदर्शनास आल्याने संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यास महालॅबने सेवेतून कमी केलेले आहे. तसेच, संबंधित मे. एचएलएल लाईफ केअर लि. या कंपनीस जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली यांनी नोटीस दिलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्यामार्फत नोंदीत सक्रीय बांधकाम कामगार व त्यांचे कुंटुंबियांसाठी मंडळाच्या तपासणी ते उपचार या आरोग्य योजनेंतर्गत २३ प्रकारच्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या मे. एचएलएल लाईफ केअर लि. व मे.एचएससीसी इंडिया लि. या सेवापुरवठादार संस्थांव्दारे आरोग्य तपासणी शिबीर व घरोघरी भेटी देऊन नि:शुल्क केल्या जातात. सदर तपासणीवेळी सेवापुरवठादार संस्थेकडून लाभार्थ्याचा फोटो, डिजीटल स्वाक्षरी आणि हाताचे ठसे इ. बायोमॅट्रीक घेऊन त्याची पोच देण्यात येत असल्याने बोगस रूग्ण दाखवल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

लाभार्थ्याची फसवणूक होऊ नये याकरीता सदर तपासणीचे अहवाल लाभार्थ्यांना हस्तपोच देण्यात येतात. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे संबंधित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या नोंदीत भ्रमणध्वनीवर SMS व्दारे लिंक पाठविली जाते. संबंधित लिंकव्दारे बांधकाम कामगारांना त्यांचे आरोग्य तपासणी अहवाल डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासंदर्भात कोणत्याही लाभार्थ्याची बोगस रिपोटर्स/फसवणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. सबब, सदर योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जे.जे. रुग्णालय (मुंबई) येथील निवासी डॉक्टरांचे प्रलंबित विद्यावेतन अदा करणेबाबत

**(२८) * १२३७ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.जे.रुग्णालय (मुंबई) येथील निवासी डॉक्टरांचे मागील तीन महिन्यांचे विद्यावेतन प्रलंबित असल्याने सदर डॉक्टरांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी डॉक्टरांना नियमित विद्यावेतन देण्याच्या सूचना तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यासुमारास दिल्या असतानाही सदरहू विद्यावेतन देण्याकरीता विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना प्रलंबित विद्यावेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर पर्यंत संस्थेला वितरीत करण्यात आलेले अर्थसंकल्पित अनुदान पूर्णत: खर्ची पडल्यामुळे जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे ऑक्टोबर महिन्याचे १२ दिवसांचे, नोव्हेंबर महिन्याचे ३० दिवसांचे तर डिसेंबर महिन्याचे ३१ दिवसांचे विद्यावेतन प्रलंबित होते.

(२) निवासी डॉक्टरांच्या नियमित विद्यावेतनाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०८/२०२४ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निर्देशांनुसार प्रत्येक चालू महिन्याच्या २० तारखेस त्यापुढील महिन्याचे विद्यावेतन अदा करण्यासाठी आवश्यक निधी बीम्स प्रणालीवर नियमितपणे उपलब्ध करुन देणेबाबत वित्त विभागाने स्थायी आदेश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी विद्यार्थ्यांच्या खात्यात विद्यावेतन जमा होण्यासाठी आवश्यक ते नियोजन संचालनालय तसेच सर्व संस्था स्तरावरुन करण्यात येऊन संस्थांमध्ये कार्यरत निवासी डॉक्टरांना नियमितपणे दरमहा विद्यावेतन अदा करण्यात येत आहे.

तथापि, काही वेळेस संस्थेमध्ये कार्यरत निवासी डॉक्टर्स च्या संख्येत वाढ झाल्यास तसेच महागाई भत्याच्या दरात वाढ झाल्यास संस्थेस मंजूर असलेले मूळ अर्थसंकल्पित अनुदान विद्यावेतन अदा करण्याकरीता अपुरे पडते व त्यामुळे विद्यावेतन अदा करण्यास विलंब होतो. अशा वेळी पुरवणी मागणीव्दारे संबंधित संस्थांना अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे प्रलंबित विद्यावेतन अदा होण्याच्या अनुषंगाने संस्थेने केलेल्या मागणीनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने मूळ अर्थसंकल्पित तरतूद १०० टक्के प्रमाणात वितरीत करण्यात आली व तद्नंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचे विद्यावेतन जानेवारी महिन्यामध्ये पूर्णत: अदा करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे, जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनाची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी विधानमंडळ हिवाळी अधिवेशन-२०२४ मध्ये रुपये ३१४१५७ हजार अतिरिक्त निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीप्रमाणे, जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे जानेवारी, २०२५ पर्यंतचे विद्यावेतन अदा करण्यात आले आहे.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील साठवण तलावाच्या सर्वेक्षणाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२९) * १४०२ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यात मृद व जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग तसेच पाटबंधारे विभागाअंतर्गत केलेले बंधारे, साठवण तलाव तसेच रुपांतरीत साठवण तलावांच्या सर्वेक्षणाची कामे शासकीय अभियंता अथवा मनुष्यबळ कमी असल्यास खाजगी अभियंत्यामार्फत करून घेण्याबाबतचे शासकीय परिपत्रक असताना तेथील मजुर संस्थांमार्फत अंगमेहनतीच्या कामाशिवाय कार्यालयांचे अंदाजपत्रक तयार करणे, बंधारांच्या कामांचे सर्वेक्षण करणे अशी अनेक बेकायदेशीर कामे करून घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरण उघडकीस येऊ नये म्हणून संबंधित कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता यांच्या सहमतीने सदरहू बेकायदेशीर कामांची मोजमाप पुस्तके व इतर कागदपत्रे नष्ट करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मजुर संस्थांमार्फत केलेल्या बेकायदेशीर कामांची तपासणी करुन याप्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात संबंधितांकडून खूलासा मागविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व रूग्णालयांमध्ये राज्य औषध अनुसूची (शेड्युल्ड ड्रग्जचा) पुरवठा नियमित करण्याबाबत

**(३०) * ५३१ श्रीमती चित्रा वाघ** : **सन्माननीय** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री **पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यातील सर्व रूग्णालयांमध्ये राज्य औषध अनुसूची औषधांचा (शेड्युल्ड ड्रग्जचा) वेळीच पुरवठा होत नसल्याने गाव व जिल्हा/शहर पातळीवर अनेक ठिकाणी औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा काढूनही राज्य औषध अनुसूची औषधांचा (शेड्युल्ड ड्रग्जचा) पुरवठा अनेकवेळा कंत्राटदार करत नाही किंवा निघालेल्या निविदा रद्द होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक कंत्राटदार काम मिळावे म्हणून निविदा कमी किमतीने भरतात मात्र प्रत्यक्षात निविदा मिळाल्यानंतर औषधांच्या किमती व निविदेच्या रकमेत तफावत असल्याकारणाने ते राज्य औषध अनुसूची औषधांचा (शेड्युल्ड ड्रग्जचा) पुरवठा करण्यास असमर्थता दर्शवितात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त कारणांमुळे औषधांचा पुरवठा योग्य वेळेत न झाल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्ण दगावण्याच्या घटना घडत असून, उक्त निविदा यंत्रणेतील त्रुटी तसेच निविदा प्राप्त झाल्यानंतर राज्य औषध अनुसूची औषधांचा (शेड्युल्ड ड्रग्जचा) पुरवठा न करणाऱ्या दोषी कंत्राटदारांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंब कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरात सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * ५८६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या कुंभोज आयुष्यमान आरोग्य मंदिरात पाण्याची कोणतीही सुविधा नसल्याने येथे येणाऱ्या अनेक रुग्णांना व कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाण्याच्या समस्येस सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नागरीकांनी आणि रुग्णांनी वेळोवेळी तक्रारी करूनही रुग्णालय प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

मौजे कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे नव्याने सुरु करण्यात आलेल्या कुंभोज आयुष्यमान आरोग्य मंदिरात पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याकरीता ग्रामपंचायत समितीमार्फत पाण्याचे नळ जोडणी केलेली आहे. तथापि, कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने पाण्यासंदर्भात काही प्रमाणात गैरसोय होत होती.

(२) व (३) कुंभोज आयुष्यमान आरोग्य मंदिरात पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याकरीता ग्रामपंचायतद्वारे करण्यात आलेल्या नळ जोडणीमार्फत कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने यावर उपाययोजना म्हणून दिनांक ०५/०१/२०२५ रोजी नळाला विज मोटर पंप बसविण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत रुग्णांना पाण्याची सोय उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय आयुर्वेद व वैद्यकीय महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * ४७२ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे गत सहा वर्षांपासून रिक्त असल्याचे तसेच एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या ८०० जागा वाढल्या असूनही नवीन परवानगी मिळालेल्या आठ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिकविण्यासाठी अध्यापक नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) खाजगी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमधील पदभरती संदर्भातील प्रकरण मा.उच्च न्यायालय व त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट होते त्यामुळे पदभरतीस अडचण निर्माण झाली होती. राज्य शासनाने शासन निर्णय क्र.एडीआर-२०१७/प्र.क्र.०५/ १७/आयु-२ दिनांक ०७/१०/२०२४ अन्वये खाजगी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या पदभरतीसंदर्भात निवडीचे अधिकार संस्थांना आहेत. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रकरण निकाली काढले आहे. त्यामुळे आता खाजगी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये अध्यापकांच्या भरतीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

नवीन परवानगी मिळालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मंजूर ३६८ अध्यापकांपैकी २५३ पदे नियमित / सेवावर्ग / करार पध्दतीने भरण्यात आली आहेत. शासकीय आयुर्वेद तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रगतीपथावर असून सदर पदे प्राधान्याने उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने काही विषयांतील अध्यापकांच्या शासनास शिफारशी केल्या आहेत. त्या उमेदवारांना रूजू करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राबविण्यात येणारी पदभरती येत्या काही महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच शासकीय आयुर्वेद व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील रिक्त असलेली पदे तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीने भरण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन जीव औषधी निर्माण महामंडळामार्फत औषधांचा/ वैद्यकीय वस्तूंचा पुरवठा नियमित होत नसल्याबाबत

**(३३) * ४३४ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सचिन अहिर, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषधांचा पुरवठा करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीमध्ये हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला रुपये ४ हजार २९८ कोटींच्या निधी उपलब्ध करून यापैकी रुपये २ हजार ९९८ कोटींचा औषधांचा पुरवठा करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीपैकी सद्य:स्थितीत २ हजार ५२ कोटी रुपयांचा इतका निधी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडे शिल्लक असून महामंडळाने सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ या सहा वर्षांमध्ये आरोग्यसेवा संस्थांनी मागणी केलेल्या वस्तूंपैकी ७१ टक्के वस्तूंचा पुरवठा केला नसल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान कॅगच्या अहवालातून उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने जबाबदार असलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?
**श्री.हसन मुश्रीफ :** (१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीमध्ये हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला एकूण रुपये २६५३.७७ कोटी एवढा निधी औषधे, सर्जिकल साहित्य, रसायने, उपकरणे इत्यादी बाबींच्या खरेदीसाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यापैकी रुपये १०३०.३८ कोटी निधी खर्च झाला आहे.
(२) हाफकिन महामंडळाकडे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशिवाय सार्वजनिक आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियानाने सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत रुपये १७३१ कोटी निधी औषधे व उपकरणे खरेदी करीता वर्ग करण्यात आला त्यापैकी रुपये १४०० कोटी एवढा खर्च झाला आहे.

कॅगचा मुद्दा हा प्रत्यक्ष औषध खरेदी संदर्भात नसून औषध खरेदीसाठी संक्षिप्त बिलांवर काढलेल्या रक्कमेचे तपशीलवार बील सादर न केल्या संदर्भातील आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वडखळ (ता.पेण, जि.रायगड) येथील अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या सकस आहाराच्या पाकिटात मृत उंदीर सापडल्याबाबत

**(३४) * १७२७ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास सेवायोजनेतंर्गत मौजे वडखळ (ता.पेण, जि.रायगड) येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील अंगणवाडी शाळा क्रमांक ३ मध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटांच्या मुलांना घरपोच वाटप होणाऱ्या मल्टी मिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन या सकस आहाराच्या पाकिटात मेलेला उंदीर आढळून आल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणातील दोषी कर्मचारी, अधिकारी व कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच मुलांना उत्तम दर्जाचा सकस आहार पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अंगणवाडी सेविका यांना घरपोच आहार वाटप करताना मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीनचे एक पाकीट कडक लागल्याने सदर पाकीट अंगणवाडी केंद्रामध्ये उघडण्यात आले. त्यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी तात्काळ तेथे भेट दिली. सदर पाकीट खोलून पाहिले असता त्यामध्ये मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष आढळून आले. त्यामुळे पुढील आहार वाटप तात्काळ थांबवण्यात आला.

तसेच ज्या लाभार्थ्यांना आहार वाटप केला होता त्यांचा आहार अंगणवाडी सेविकेमार्फत अंगणवाडी केंद्रामध्ये जमा करुन घेण्यात आला. जमा करुन घेण्यात आलेल्या आहारापैकी आहाराचा नमुना सरपंच, सदस्य व ग्रामस्थांसमोर पंचनामा करुन हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीकरता पाठविण्यात आला होता.सदर अहवालानुसार घरपोच आहार खाण्यास योग्य आहे. तसेच संशयास्पद मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष असलेल्या आहाराचे पाकीट देखील तपासणीसाठी हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. परंतु, सदर प्रयोगशाळेने सदरचा नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही. त्यामुळे दिनांक २९/०१/२०२५ रोजी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचलनालय-मुंबई येथे सदर नमुना तपासणीकरता पाठविण्यात आला, परंतु त्या ठिकाणी देखील आहार नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही.

वडखळ ग्रामपंचायत अंतर्गत सर्व अंगणवाडी केंद्रातील वाटप झालेला घरपोच आहार ताब्यात घेवून पुन्हा नव्याने घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात आलेला आहे. संबंधित पुरवठाधारकास सदर पुरवठ्याबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते, त्यानुसार संबंधित पुरवठाधारकाचा खुलासा प्राप्त झालेला आहे. सदर खुलाशानुसार घरपोच आहार हा फुल्ली ॲटोमॅटीक (मानवी हस्तक्षेप विरहीत) मशीनद्वारे तयार केला जातो. तसेच, सदर माल तयार झाल्यानंतर तो माल अंगणवाडीपर्यंत पोहचण्यासाठी १५ ते २० दिवसांचा कालावधी लागतो. सदर माल फॅक्टरीतून अंगणवाडी पर्यंत पोहचण्याच्या कालावधीवरून पाकीटामध्ये आढळून आलेला प्राणी सदृश अवशेष कोरड्या स्वरूपात आढळून यायला पाहिजे होता.परंतु पाकीटामधील प्राण्याचे अवशेष ओल्या स्वरूपात असून तो एक ते दोन दिवसांपूर्वीच मृत झाला असावा असे वाटत आहे. तसेच फुल्ली ऑटोमॅटीक मशिनद्वारे घरपोच आहार तयार झाल्यामुळे पाकीटामध्ये उंदीर किंवा त्यासदृश दिसणाऱ्या वस्तूचे अस्तित्व राहणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहत परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(३५)** * ८२९ **श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहत परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज अनेक वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा करित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री, उद्योग व संबंधित विभागाचे अधिकारी यांचेसमवेत माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी, पुणे व पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांनी स्वतः पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात असे निर्देश संबंधितांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०७/२०२४ रोजी आयोजित बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार दिनांक ०१/०८/२०२४ रोजी पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड व इतर विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

(३) चाकण वाहतूक समस्या सोडविण्यासाठी दिनांक ०१/०८/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान ज्या उपाय योजना सुचविण्यात आल्या त्यानुषंगाने मऔवि महामंडळामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे:-

१. चाकण टप्पा क्र.३ मध्ये रस्त्यावरील पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक तेथे सिमेंट काँक्रीट पाईप टाकण्यात आले आहेत.

२. सद्य:स्थितीत चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी कमी होण्याकरीता टप्पा क्र.१,२,३ व ४ मधील कामकाज सुरु होण्याच्या व संपण्याच्या वेळेमध्ये १५ मिनिटांचे अंतर ठेवण्यात आले आहे.

३. चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र. ३ मधील क्षेत्रातील विद्युत वितरण कंपनीच्या उच्चदाब वाहिनीखाली पार्किंगसाठी जागा उपलब्ध होण्याकरीता विद्युत पारेषण कंपनीचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

४. सदर क्षेत्रातील कंपन्यांच्या भूखंडामधून वाहून येणारे पावसाचे पाणी रस्त्यावर न येण्यासाठी रस्त्यालगतच्या गटारामध्ये सोडण्याची व्यवस्था करण्याबाबत संबंधित कंपन्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

५. मऔवि महामंडळाच्या हद्दीतील पावसाळी नाले गाळमुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल.

६. मोठ्या कंपन्यांच्या बसेस त्यांच्याच भुखंडाच्या आत उभ्या करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिनांक ०८/१०/२०२४ रोजीच्या वाहतूक नियोजन आढावा बैठकीत दिलेल्या आहेत.

७. आजमितीस पोलीस खात्याच्या सूचनेनुसार काही भागात एकेरी वाहतूक दिनांक ०२/१२/२०२४ पासून सुरु करण्यात आली आहे. त्याप्रमाणे वाहतूक समस्या काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.

८. मऔवि महामंडळाच्या क्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करण्यात येत असल्याने वाहतूक सुरळीत होण्यास मदत झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो), नागपूर येथे निवासी वसतिगृह बांधून रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) * ३९६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेडिकल तसेच मेयो या रुग्णालयात अनेक गैरसोयी तसेच सोयीसुविधांचा अभाव असून रुग्णालयात मागील काही वर्षांपासून अनेक पदे रिक्त असून येथील २५० निवासी डॉक्टरांकरीता वसतिगृह बांधण्याचे कामही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असून येथील कार्यरत डॉक्टर व इतर रुग्णांलयीन कर्मचाऱ्यांवर उक्त रिक्त पदांमुळे कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर येथील मेडीकल कॉलेज मध्ये सोयीसुविधा पुरविण्याबाबत तसेच येथील रिक्त पदे भरण्याबाबत व वसतिगृहाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही

(३) वर्ग-३ संवर्गातील पदे भरण्यात आलेली असून प्राध्यापक संवर्गातील पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी निवासी डॉक्टरांकरीता वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करुन २५० खोल्यांचे महाविद्यालयास हस्तांतरण करण्यात आलेले आहे. तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर अंतर्गत निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील सर्व औद्योगिक उपक्रमांमधील नोकऱ्यांमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्याने सामावून घेण्याबाबत

**(३७)** * **२१८ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक विकासातून स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून सर्व सुक्ष्म, लघू, मध्यम व विशाल औद्योगिक उपक्रमांत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने सामावून घेण्याबाबत शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला असतानाही आजमितीस राज्यातील बहुतांश औद्योगिक उपक्रमांतील नोकऱ्यांमध्ये स्थानिक उमेदवारांना डावलले जात असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणाचा नियमित आढावा घेण्यासाठी राज्य स्तरावर विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समित्या निष्प्रभ ठरल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याने राज्यातील अनेक स्थानिक उमेदवारांना नोकऱ्या न मिळाल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) दिनांक १७ नोंव्हेबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य असलेली व्यक्ती ही स्थानिक व्यक्ती म्हणून समजली जाते. त्यानुसार राज्यातील औद्योगिक उपक्रमांमध्ये ८० % पेक्षा जास्त स्थानिक उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तथापि, राज्यातील बहुतांश औद्योगिक उपक्रमातील नोकऱ्यांमध्ये स्थानिक उमेदवारांना डावलले जात असल्याबाबत कोणतेही निवेदन उद्योग विभागास अथवा क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर येथे नवीन जिल्हा सामान्य रुग्णालयाची उभारणी करणेबाबत

**(३८) * २५४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेले लातूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे वैद्यकीय शिक्षण विभागाकडे मनुष्यबळासह दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान वर्ग करण्यात आले असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने सदर ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय उभारले असून सद्य:स्थितीत ते कार्यान्वित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर येथे नवीन जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यासाठी कृषी महाविद्यालयाची १० एकर जमीन आरोग्य विभागास देणेसाठी आरोग्य व कृषी विभागाची संमती असून कृषी महाविद्यालयाच्या जमिनीचे बाजार मुल्य रुपये ३३२ लक्ष अदा न केल्यामुळे जमिनीचे हस्तांतरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागाने बाजार मुल्याप्रमाणे होणारी रक्कम कृषी महाविद्यालयास अदा करुन व जमीन ताब्यात घेवून जिल्हा सामान्य रुग्णालय कार्यान्वित करावे अशी येथील स्थानिक नागरिकांनी केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, दिनांक ११/०९/२००७ नुसार लातूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालय ज्या जमीनीवर आहे ती जमीन त्यावरील चल व अचल संपत्ती तसेच रुग्णालयातील सर्व यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसह माहे ऑक्टोबर, २००८ दरम्यान वर्ग करण्यात आलेले असून सदर ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय हे सामान्य रुग्णालय, लातूर हस्तांतरित केल्यापासून कार्यान्वित आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

लातूर येथील सर्वे नं.३७ मधील १० एकर जमिनीच्या मोबदल्याची रक्कम रुपये ३,३२,६८,६५०/- (अक्षरी तीन कोटी बत्तीस लक्ष अडुसष्ट हजार सहाशे पन्नास रुपये) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना अदा करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. विहीत पध्दतीने निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाकरीता एम.आर.आय. मशीन खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(३९) * ७९४ श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या गंभीर आजाराचे निदान करण्यासाठी एम.आर.आय. (चुंबकीय अनुनाद इमेजिंग) मशीन खरेदी करण्यासाठी शासनाकडून १०.९० कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही अद्याप सदर मशीनची खरेदी करण्यात आली नसल्यामुळे हजारो गरजू रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.आर.आय. मशीन खरेदीसाठी नेमलेल्या हाफकिन संस्थेने सुमारे आठ वर्ष खरेदी प्रक्रिया पूर्ण न केल्याने मंजूर असलेला निधी शासनाकडे परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.आर.आय ३ टेस्ला मशीन खरेदी करण्याचा प्रस्ताव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला यांचेकडून सन २०१७ मध्ये वा त्यासुमारास वैद्यकीय शिक्षण व औषध विभागाकडे पाठविला होता, त्यानुसार राज्य शासनाने हा प्रस्ताव मान्य करून दोन टप्प्यात निधी मंजूर केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांच्या सोयीसाठी एम.आर.आय. मशीन खरेदी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच खरेदीस दिरंगाई करणाऱ्या हाफकिन संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला येथे एम.आर.आय. यंत्रसामुग्री कार्यान्वित असून त्याव्दारे रुग्ण उपचार सुरु आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

-----------------

## कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविल्या जात असलेल्या योजनांमध्ये प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडिया या दोन कामांचा समावेश करण्याबाबत

**(४०) * ९९५ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कामगार विभागाच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविल्या जात असलेल्या योजनेत एकूण ५३ प्रकारच्या कामांचा व कामगारांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये आकाशवाणी (रेडिओ), दूरदर्शन, तारायंत्र (टेलिग्राफ) आणि समुद्रपार दळणवळण सेवा (ओव्हरसीज कम्युनिकेशन्स) आदी विभागातील कामगारांचाही समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील कामांच्या व कामगारांच्या यादीत प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडिया या दोन कामांचा समावेश करुन सदरहू क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कुटुंबांना कामगार मंडळाच्या योजनांचा लाभ देण्यात यावा अशी मागणी मागील तीन वर्षांपासून व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ अधिनियमाच्या कलम २ (डी) नुसार कामगारांची व्याख्या करण्यात आलेली आहे.

बांधकाम कामगारांची नोंदणी जास्तीत जास्त व्हावी याकरीता बांधकाम क्षेत्राशी निगडित विविध उद्योग क्षेत्रातील कामगारांची नोंदणी मंडळात होण्याकरीता २१ उद्योगांतील कामगारांना नोंदणी करण्याबाबत व सदर उद्योग अधिसूचित करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक १२/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक १८/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये इमारत किंवा इतर बांधकाम कामगारांनी करावयाची २१ कामे विनिर्दिष्ट केली आहेत.

उक्त अधिनियमाच्या कलम २ (डी) मध्ये कामगारांची व्याख्या नमूद असून त्यानुषंगाने प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया या क्षेत्राबाबतच्या कामाचा समावेश उक्त अधिनियमात करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील भूखंड अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेला वाटप केल्याबाबत

**(४१) * ६९१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगधंदे अन्य राज्यांत जात असताना औद्योगिक वातावरणनिर्मितीची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाने अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील तीन ते चार एकरचा भूखंड मा.उद्योग मंत्री हे विश्वस्त असलेल्या अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेला देण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्यनिर्मिती हा व्यवसाय मानला जात असला तरी उद्योग वर्गात त्याची गणना केली जात नाही तसेच वृध्दाश्रम किंवा नाटयसृष्टीसाठी भूखंड देण्याचे एमआयडीसीचे धोरण नसताना भारतीय मराठी नाटय परिषदेला अंबरनाथ औद्योगिक वसाहतीतील भूखंड देण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, भूखंड वाटप करण्याबाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे तसेच सदरचा भूखंड वाटप धोरणबाहय असल्यास या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२), (३) व (४) अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेस अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील भूखंड वाटप करावा अशी विनंती मऔवि महामंडळाकडे प्राप्त झाली आहे.

CDCPR-२०२३ मधील तरतुदींनुसार सुविधा भुखंडावर वृध्दाश्रम, पाळणाघर, शाळा, महाविद्यालय, क्रिडांगण, वाहनतळ इ.प्रयोजन अनुज्ञेय आहे. प्रस्तुत विषय मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २७/०९/२०२४ च्या ४०२ व्या बैठकीत ठेवण्यात आला होता. तथापि, याबाबत अदयापी अंतिम निर्णय झालेला नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी रुग्णालयांत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत विशेष तपासणी मोहिम राबविण्याबाबत

**(४२)** * **५३३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून वैद्यकीय आस्थापना कायद्यासह इतर नियमांचे पालन न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना आणि रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने राज्यातील खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली असून, या मोहिमेसाठी जिल्हा स्तरावर पथकांची नियुक्ती करण्याचा आदेश आरोग्य विभागाने काढल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांना सुधारणा करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाईल आणि त्यानंतरही सुधारणा न झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, अशी प्रक्रिया ठरविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३ मध्ये वा त्यासुमारास आरोग्य विभागाच्या तपासणी मध्ये राज्यातील विशेषत: पुण्यातील मोठ्या खाजगी आणि धर्मादाय रुग्णालयांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास येवूनही अद्याप त्यांच्याविरुध्द कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसून त्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपासणी मोहिम यशस्वीरित्या राबवून नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर तात्काळ कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

सन २०२३ मध्ये उप संचालक, आरोग्य सेवा पुणे यांचेकडून प्राथमिक स्वरुपात पुणे शहरातील खाजगी आणि धर्मदाय अशा एकूण ११ रुग्णालयांची तपासणी करण्यात आलेली होती. सदर रुग्णालयांच्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रूटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित खाजगी रुग्णालयांना कळविण्यात आले होते. तद्नंतर त्या रुग्णालयाकडून त्रूटी पूर्तता करण्यात आलेली असल्यामुळे त्या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आलेल्या रुग्णालयांना नोटीसी बजावण्यात आल्या असून, सदर रुग्णालयांना सुधारणा करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील बालविवाह रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४३) * ५०३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात गत दोन वर्षात बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्याने अल्पवयीन मुलींना गर्भधारणा होण्याचे प्रमाणातही जिल्ह्यात लक्षणीय वाढ झाली असून अल्पवयीन मातांकडून होणाऱ्या प्रसुतीनंतर अशा मुलांमध्ये कुपोषणाची समस्या तसेच माता आणि बालमृत्यू होण्याची शक्यता वाढली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात गत दोन वर्षात बालविवाहांचे १२ गुन्हे दाखल झाले असून बालविवाह झाल्याने किशोरवयीन महिलांमध्ये अतितीव्र कमी वजन असलेले (सॅम) आणि तीव्र कमी वजन असलेले (मॅम) बालक जन्माचे प्रमाणात वाढ होत असून कुपोषणाच्या या दोन्ही गटांमधील बालकांच्या वजनात वाढ व अल्पवयीन माता मृत्यू रोखण्यासाठी जिल्ह्यात अजूनही मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर बालविवाह रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यात गत दोन वर्षात एकूण १४ बालविवाह थांबविण्यात आले असून एका प्रकरणामध्ये बालविवाह झाल्याने पोलिसांमार्फत FIR दाखल करण्यात आला आहे.
बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी नियमित पुरक पोषण आहाराव्यतिरिक्त सॅम बालकांना अतिरीक्त आहार देण्यात येतो. तसेच, पोषण अभियानाअंतर्गत पोषण विषयक जनजागृती करण्यात येते.
(३) बालविवाह रोखण्यासाठी बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २००८ निरसित करून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ तयार करण्यात आले आहेत.

राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीमधील ग्राम सेवकांना त्यांच्या ग्राम पंचायतीच्या क्षेत्रात बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यात आले असून त्यांना सहाय्य करण्यासाठी अंगणवाडी सेविका यांना नियुक्त करण्यात आलेले आहे. तसेच नागरी भागासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बालविकास प्रकल्प अधिकारी यांना व सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना घोषित करण्यात आलेले आहे.

प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षा मार्फत बाल विवाहाच्या प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येते. तसेच, संबंधितांना याबाबत प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील केसगळतीच्या रुग्णांकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४४) * ४३८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विक्रम काळे, श्री.पंकज भुजबळ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील पूर्णा नदीकाठच्या काही गावांमध्ये अचानक नागरिकांना केस गळतीचा त्रास सुरु होऊन केसगळतीच्या रुग्णांची संख्या दिडशे ते दोनशेच्यावर पोहोचली असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोंडगाव, भोनगाव, कालवड, कठोरा, मच्छिंद्रखेड, हिंगणा वैजिनाथ, घुई, तरोडा कसबा, माटरगाव, पहुरजिरा, निंबी या गावात मोठ्या प्रमाणात केसगळतीचे रुग्ण आढळून येत असून शासनामार्फत शेगाव तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक भागातले पाण्याचे नमुने घेण्यात आले असून सदर प्रकरणी अद्याप निदान होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्व्हे करण्यात आला आहे काय तसेच या आजारावर उपचार व कायम प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, कठोरा, भोनगाव, मच्छिंद्रखेड, हिंगणा, घुई, तरोडा कसबा, वरखेड, कनारखेड, गायगाव, नागझरी, पहुरजिरा, माटरगाव बु.निंबी, जलंब व नांदूरा तालुक्यातील वाडी या गावांमध्ये दिनांक ०८/०१/२०२५ रोजी पासून तसेच दिनांक माहे फेब्रुवारी पासून गायगाव, नागझरी व खामगाव तालुक्यातील जयपुर लांडे या १८ गावांमध्ये केस गळतीच्या समस्या असणारे नागरिक आढळून आले आहेत.

सदर गावातील पाणी नमुने/स्किन बायोप्सी/रक्त नमुन्यांची तपासणी केली.

दिनांक १०/०१/२०२५ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथील पथक, दिनांक १२/०१/२०२५ रोजी D.M.E.R यांचेकडील पथक, दिनांक १५/०१/२०२५ रोजी आयसीएमआरचे पथक, दिनांक २७/०१/२०२५ रोजी एम्स, नागपुर येथील पथक, आयुष विभागाचे पथक (आयुर्वेद, होमीओपॅथी, युनानी, सिध्द) इत्यादी वैद्यकिय तज्ञांनी गावांमध्ये भेटी देऊन सर्व रुग्णांची तपासणी व उपचार केले. तसेच, विविध प्रयोगशालेय तपासण्याकरीता नमुने संकलित करण्याचे काम केले. बाधित गावातील रुग्णांचे व कंट्रोल केस, त्वचा, नख, रक्त, लघवी व गावातील पाणी, माती, शेतातील पिक, अन्न धान्य, किराणा दुकानातील साहित्य, खत-औषधी इत्यादी नमुने तपासणी करीता संकलीत करुन विविध प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यात आले आहेत.

भुजल व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, बुलढाणा येथे संबंधित गावातील पाणी नमुन्यांचे नायट्रेट व टिडीएस लेव्हल बाबत तपासणी केली असता काही पाणी नमुन्यांमध्ये नायट्रेट व टिडीएसचे प्रमाण वाढलेले आढळून आले आहे. परंतु सदर पाणी हे पिण्यासाठी वापरले जात नसून इतर कामांसाठी वापरले जाते.

पाण्यामध्ये लिड, आर्सेनिक, कॅडमियम, मर्क्युरी बाबत पाणी नमुने नाशिक येथे प्रयोगशाळेत तपासणीस पाठविले असता सदर धातू योग्य प्रमाणात असल्याबाबत अहवाल प्राप्त झालेले आहेत.

मात्र ICMR यांच्या कडून तपासणी अहवाल अप्राप्त असून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्य सेविकांच्या पदभरतीमध्ये उच्चशिक्षित उमेदवारांना अपात्र केल्याबाबत**

**(४५) * ३९७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद आरोग्य सेविकांच्या ९ हजार पदभरतीकरीता सहभागी झालेल्या जवळपास ५५ हजार उमेदवारांपैकी उत्तीर्ण झालेल्या ६ हजार उमेदवारांमधून जी.एन.एम. नर्सिंग व बी.एस.सी. नर्सिंग असलेल्या उच्च शिक्षितांना अपात्र ठरविण्यात येणार असल्याने राज्यात आरोग्य सेविकांची अंदाजे ४ हजार पदे रिक्त राहणार असून यापैकी ११५ पदे नागपूर जिल्हा परिषदेतील असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदांसाठी आय.बी.पी.एस. कंपनीमार्फत माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान उक्त परीक्षा घेण्यात आली असून परिक्षेच्या जाहिरातीत "आरोग्य सेविका" या शब्दासोबतच "आरोग्य परिचारिका" असा उल्लेख करण्यात आल्याने उच्चशिक्षित उमेदवारांनीही परीक्षा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उच्चशिक्षित परिक्षार्थींना परिक्षेपूर्वी छाननीमध्ये अपात्र न ठरविता निकाल लागल्यानंतर अपात्र ठरविण्यात आल्याने त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे हे काय,

(४) असल्यास, याबाबत उक्त उत्तीर्ण उच्चशिक्षित परिक्षार्थींना जाहिरातीत नमूद केल्यानुसार "आरोग्य परिचारिका" या पदावर पात्र ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) आरोग्य सेवक (महिला) संवर्गाची एकूण ८९४९ रिक्त पदांची जाहिरात दिनांक ०५/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीत आरोग्य सेवक (महिला) या पदाची शैक्षणिक अर्हता स्पष्टपणे नमूद करण्यात आली होती. तसेच, सदरची जाहिरात ही आरोग्य सेवक (महिला)(ए.एन.एम.) पदभरतीसाठी प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरातीत नमूद केल्यानुसार ए.एन.एम शैक्षणिक अर्हता असलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांची संख्या ४२४६ इतकी आहे. तसेच, जी.एन.एम., बी.एस.सी. नर्सिंग व इतर शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांची संख्या जवळपास २२००

इतकी आहे. नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत ३६४ उमेदवार गुणवत्ता यादीत असून १९३ उमेदवारांकडे जाहिरातीनुसार ए.एन.एम. ही शैक्षणिक अर्हता असून १५३ उमेदवारांकडे जी.एन.एम. व बी.एस.सी. नर्सिंग शैक्षणिक अर्हता आहे.

(२) जाहिरातीत आरोग्य परिचारिका [आरोग्य सेवक (महिला)] असा उल्लेख आहे. तथापि, सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता स्पष्टपणे "ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील" अशी नमूद करण्यात आली आहे

(३) सदरची जाहिरात ही आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामुळे ए.एन.एम. ही शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांना पात्र ठरविण्यात आले आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झाल्या असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(४) व (५) आरोग्य सेवक (महिला) पदासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार ए.एन.एम. शैक्षणिक अर्हता धारक उमेदवार पात्र असल्याने तसे जिल्हा परिषदांना कळविण्यात आले असल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाचे व ट्रॉमा केअर सेंटरचे काम निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) * ८५७ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती १० वर्षांपूर्वी होऊनही जिल्ह्यातील ग्रामीण, दुर्गम, आदिवासीबहुल भागातील रुग्णांकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयाचे तसेच मनोर (जि.पालघर) येथील ट्रामा केअर सेंटर या दोन्ही आरोग्य संस्थांची कामे गत १० वर्षांपासून निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे तसेच ट्रामा केअर सेंटरचे काम पूर्ण झाले नसल्याने तसेच जिल्ह्यातील आरोग्य केंद्रामध्ये तज्ज्ञ डॉक्टर, नर्सेस तसेच कर्मचाऱ्यांची कमतरता असून अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा देखील अभाव असल्याने रुग्णांच्या आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असून त्यांना विशेषत: जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगडमधील रुग्णांना उपचारासाठी मुंबई, ठाणे, नाशिक येथे तसेच गुजरात राज्यातील वापी, वलसाड येथे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील आदिवासी, गरीब, सामान्य गर्भवती महिलांना उपचारासाठी नेहमीच वंचित रहावे लागत असून उपचाराअभावी १४ गर्भवती महिलांचा मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली असून, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान डहाणू तालुक्यातील सारणी गावातील पिंकी डोंगरकर या गर्भवती महिलेची प्रकृती गंभीर झाल्याने तिला पुढील उपचारासाठी सिल्वासा येथे दाखल करण्यासाठी वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने उपचाराअभावी उक्त महिला व तिच्या बाळाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन खाटा, प्राणवायू जोडणी, फर्निचर, विद्युतीकरण आणि अग्निशमन यंत्रणा इ, कामे करण्यास अतिरिक्त ४० कोटी रकमेच्या निधीअभावी सदर कामे पूर्ण झालेली नसून ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत हस्तांतरणाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे मंजूर करुन रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती प्रभावी उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या उभारणीसाठी निधी देण्यात दिरंगाई केली जात असून निधी वाटपात दुजाभाव होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, पालघर जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे तसेच मनोर येथील ट्रामा केअर सेंटर या आरोग्य संस्थांची प्रलंबित कामे पूर्ण करून रुग्णालये सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच सदर रुग्णालयांच्या कामास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
पालघर जिल्ह्यात ३ उपजिल्हा रुग्णालये व ९ ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच पालघर येथील २०० खाटांचे रुग्णालय इमारतीचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. सदर दोन्ही रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण होताच इतर आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन सदर दोन्ही रुग्णालये कार्यान्वित करण्यात येतील.

रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यामार्फत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात येतो. वैद्यकीय अधिकारी यांची ४२ टक्के पदे रिक्त असून शासन स्तरावरुन रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. नियमित वैद्यकिय अधिकारी यांची पदे रिक्त असली तरी राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करुन सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

रुग्णालयात दाखल होणाऱ्या गंभीर व अत्यावस्थ असलेल्या रुग्णांना पुढील विशेष संदर्भ सेवेची आवश्यकता असल्यास अशाच रुग्णांना नजिकच्या शासकीय रुग्णालयामध्ये संदर्भित करण्यात येते.
(३) अंशतः खरे आहे.

पालघर जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये १४ मातांचा मृत्यू हा उपचाराअभावी झालेला नाही.

डहाणू तालुक्यातील सारणी गावातील पिंकी डोंगरकर ही महिला अतिशय गंभीर स्थितीत उपजिल्हा रुग्णालय कासा जि.पालघर येथे दिनांक २६/११/२४ रोजी दु/१२/३० वाजता दाखल झाली होती. सदर महिलेची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचाराकरीता १०२ रुग्णवाहिकाद्वारे अधिपरिचारिका व अत्यावश्यक औषधे, इंजेक्शन व पुरेसा ऑक्सीजन इ.सह वलसाड येथे संदर्भित करण्यात आले. मध्येच तिची प्रकृती खालावल्याने अधिपरिचारिका यांनी प्रसंगावधान दाखवून तिला नजिकच्या सिल्वासा येथील विनोबा भावे, जिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

(४) पालघर येथील २०० खाटांचे रुग्णालय इमारतीचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगती पथावर आहेत. सदर दोन्ही रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण होताच इतर आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करुन सदर दोन्ही रुग्णालये कार्यान्वित करण्यात येतील.

(५) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्य स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीमधून पालघर जिल्ह्यामधील बांधकामाच्या मागणीनुसार अनुक्रमे दिनांक २४/०९/२०२४ रोजी रुपये १०.८९ लक्ष, दिनांक ०९/१०/२०२४ रोजी रुपये ४३८४.२३ लक्ष व दिनांक ०७/०२/२०२५ रोजी रुपये २३५०.८० लक्ष असा एकूण रुपये ६७४५.९२ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे. यामुळे निधी वाटपात दुजाभाव झालेला नाही.

(६) व (७) पालघर जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे तसेच मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण होताच इतर आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करुन सदर दोन्ही रुग्णालये सुरु करण्यात येतील.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.